# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Website : www.dtemaharashtra.gov.in


अतिरिक्त प्रवेश फेरीबाबत सूचना

जा.क्र.१०/एनजीपी/पदविका/अतिरीक्त फेरी/२०१८/ eee

दि. 18 AUG 2018

विषय:- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम व प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या शासकीय, अशासकीय अनुदानीत,विद्यापीठ विभागातील संस्थामध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांकरिता घेण्यात येणा-या अतिरिक्त प्रवेश फेरीमध्ये विनाअनुदानित संस्थांचा समावेश करणेबाबत...

संदर्भ:-१. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे असोसिएशन ऑफ द मॅनेटमेंट ऑफ पॉलीटेक्नीक्स व इतर यांनी महाराष्ट्र शासन व इतर विरुध्द दाखल केलेली रिट याचिका क्रमांक क्र. ९०९०/२०१८.

२. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे कर्मवीर काकासाहेब वाघ एज्युकेशन सोसायटी व इतर यांनी महाराष्ट्र शासन व इतर यांचे विरुध्द दाखल केलेली रिट याचिका क्रमाक २३४९५/२०१८.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम व प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेची तिसरी फेरी अनुक्रमे दि. १९.०८.२०१८ व २०.०८.२०१८ रोजी समाप्त होणार असुन तिस-या फेरीनंतर शासकीय, अशासकीय अनुदानीत, विद्यापीठ विभागातील संस्थामधील शिल्लक राहीलेल्या जागांकरीता तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत घेण्यात येणा-या प्रवेशाच्या अतिरिक्त फेरीबाबत वेळापत्रक प्रसिध्द करण्यात आलेले आहे. सदरच्या अतिरिक्त फेरीमध्ये प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम व प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित संस्थांचा समावेश करण्यासाठी संदर्भाधिन रिट याचिकां मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केल्या आहेत. सदर याचिकांचा निकाल अद्यापपर्यंत या संचालनालयास अप्राप्त आहे. त्यामुळे मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेश प्राप्त होताच न्यायालयीन आदेशानुसार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेची अतिरिक्त फेरीची पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने कळविण्यात येते की, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे संदर्भाधिन याचिकांमधील आदेश प्राप्त होईपर्यत प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम व प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित संस्थांनी केंद्रीभुत प्रवेश प्रक्रीयेच्या तिस-या फेरीनंतर रिक्त राहीलेल्या जागांवर (Against CAP Seats) या संचालनालयाचे पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत संस्थास्तरावर प्रवेश करण्यात येऊ नयेत. असे प्रवेश केल्यास सदरचे प्रवेशांना तंत्रशिक्षण संचालनालयाकडुन मान्यता देण्यात येणार नाही, याची नोंद सर्व विनाअनुदानीत प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम व प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थांनी घेण्यात यावी.

तसेच संदर्भाधिन न्यायालयीन प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचा निकाल प्राप्त होताच अतिरिक्त फेरीच्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेबाबतची सुधारित अधिसूचना तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घेण्यात यावी.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत:-माहीती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित

१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती, औरंगाबाद, नाशिक, नागपूर, मुंबई, पुणे

२) प्राचार्य/संचालक, प्रथम वर्ष व्यावसायिक पदविका अभियांत्रिकी व औषध निर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या सर्व विनाअनुदानित संस्था

३) कार्यासन क्र. ३, मुख्य कार्यालय, मुंबई